# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये **'मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास'** चार प्रकरणामधून करण्यात आला आहे. या प्रकरणांमधून अभ्यास केल्यानंतर हाती आलेले 'निष्कर्ष' 'उपसंहार' या प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात आले आहेत.

मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास करताना त्यांच्या 'हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' या कथासंग्रहाचा आधार घेण्यात आला आहे. मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास करीत असताना कथा म्हणजे काय? कथेचे स्वरूप, 'मराठी कथालेखनामध्ये स्त्रियांचे योगदान' याची चर्चा केली आहे.

मराठी कथालेखनामध्ये स्त्रियांच्या कथालेखनाची सुरवात कशी झाली? कथालेखिकांनी आपल्या कथालेखनामध्ये स्त्रियांच्या कोणकोणत्या समस्यांचा वेध घेतला आहे? याचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने काशिताई कानिटकर, आनंदीबाई शिर्के, विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे, ज्योत्स्ना देवधर, विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, गौरी देशपांडे, सानिया यांच्या कथालेखनाचा आढावा घेण्यात आला आहे. त्याचे निष्कर्ष सारांशरूपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

गद्य वाङ्मयप्रकारामध्ये कथा हा वाङ्मयप्रकार अदिमकाळापासून कुठल्या ना कुठल्या स्वरूपात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. लोककथेच्या रूपाने तो फार काळापासून रूढ आहे. आजच्या आधुनिक कथेचे मूळ मौखिक कथा व गोष्टीत आढळते.

१. 'कथा' या शब्दातच कथेचे प्रवाहित्त्व स्पष्ट होते. 'कथा' या शब्दाचा अर्थ 'रचलेली गोष्ट', 'हकीकत', 'वर्णन' 'कल्पित गोष्ट' असे सांगता येतील.

२. 'मानवी जीवनातील विशिष्ट प्रसंगाच्या साह्याने मर्यादित भाषिक अवकाशात रचलेला कथात्म अनुभव म्हणजे कथा होय.'

३. कथा आणि कादंबरी हे कथात्म वाङ्मयाचे प्रकार आहेत. त्यापैकी कथा हा स्फुट वाङ्मयप्रकार असून कादंबरी हा दीर्घ वाङ्मयप्रकार आहे. कादंबरी आणि कथेमध्ये आशय, व्याप्ती, जीवनानुभव व्यक्त करण्याची पद्धती यासारख्या घटकांमध्ये फरक आढळतो. म्हणून कथा आणि कादंबरी हे वाङ्मयप्रकार स्वरूपाच्या दृष्टीने एकसारखे वाटले तरी ते वेगवेगळे ठरतात.

४. कथा हा वाङ्मयप्रकार वाचकांच्या मनावर एकच एक संस्कार करतो. रचना, अनुभवाचे एककेंद्रित्व, नेमकेपणा व काटेकोरपणा या सर्व वैशिष्ट्यांमुळे कथा हा वाङ्मयप्रकार वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.

५. कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, निवेदन, भाषा या मूलघटकांच्या साह्याने कथा हा वाङ्मयप्रकार आकारास येत असतो. लेखकपरत्वे कथेच्या या घटकांमध्ये कमी-अधिक स्वरूप येऊ शकते.

६. सर्वसाधारणपणे सर्फोजी राजे यांनी इसापनीतीचे भाषांतर कलेल्या 'बालबोध मुक्तावली' या कथेच्या पुस्तकापासून मराठी कथालेखनाला सुरवात झाली. भाषांतरित स्वरूपाच्या कथेमध्ये ह. ना. आपटे यांनी बदल करून श्रवणीय असणारी कथा वाचनीय करण्याचे कार्य केले.

७. शांताबाई या लेखिकेने लिहिलेली 'बिचारी आनंदीबाई' या कथेने मराठीतील स्त्रियांच्या कथालेखनाचा आरंभ झाला. मराठी वाङ्मयात स्त्रियांच्या कथालेखनाचा आरंभ ते आनंदीबाई शिर्के यांच्या कथालेखनापर्यंत कथालेखिकांनी प्रामुख्याने बोधवादी आणि अद्‌भुतरम्यता या दृष्टीने कथालेखन केल्याचे दिसून येते.

८. १९२० नंतर कथालेखिकांच्या लेखनामध्ये बदल झालेला आढळतो. सुरवातीला बोधवादी दृष्टिकोनाचा प्रभाव कथालेखिकांच्या लेखनामध्ये असला तरी नंतर वास्तववादी दृष्टिकोन ठेवून लेखन केलेले आढळते.

९. १९२० ते १९४५ हा कालखंड मराठी वाङ्मयामध्ये 'फडके -खांडेकर युग' म्हणून ओळखला जात असला तरी त्यांच्या स्वप्नरंजनवादी, कलावादी कथालेखनाचा प्रभाव मराठी कथालेखिकांच्या लेखनावर पडलेला दिसत नाही. विभावरी शिरूरकर यांनी समाजव्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणाऱ्या स्त्रियांचे चित्रण आलेले आहे तर जीवनविषयक निष्ठा आणि सर्व मानवांविषयी आपलेपणा हे कुसुमावती देशपांडे यांच्या कथेची वैशिष्ट्ये आहेत. याशिवाय प्रौढ कुमारिकेचा प्रश्न, पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रीमनाची होणारी कुचंबणा, कौटुंबिक जीवनातील समस्यांचा वेध या कालखंडातील कथालेखिकांच्या कथालेखनात घेतल्याचे दिसते.

१०. १९४५ ते १९६० हा नवकथेचा कालखंड मानला जात असला तरी या कालखंडामध्ये वसुंधरा पटवर्धन, शिरीष पै. शांता शेळके यासारख्या मोजक्या लेखिकांचा अपवाद वगळला तरी स्त्री लेखिका फारश्या झालेल्या दिसत नाहीत. त्यांच्या लेखनावर नवकथेचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. घर, पती, मुले या मर्यादित विश्वातील समस्यांचा वेध या कालखंडातील कथालेखिकांनी घेतला असला तरी दुसऱ्या महायुद्धाचे मानव जातीवर होणारे भीषण परिणाम, यांत्रिकीकरणाची सुरवात, मानवी मनाचा उद्धवस्तपणा यासारख्या समस्यांचा वेध मात्र त्यांनी घेतला नाही.

११. १९६० नंतरच्या कालखंडात कथा या वाङ्मयप्रकारांमध्ये स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात कथालेखन केलेले दिसते. कमल देसाई, गौरी देशपांडे, ज्योत्स्ना देवधर, आशा बगे, प्रिया तेंडुलकर, सानिया, उर्मिला पवार यासारख्या कथालेखिकांनी कथालेखनांमध्ये स्त्रीविषयक विविध प्रश्नांचा वेध घेतलेला दिसतो.

१२. १९६० नंतरच्या लेखिकांनी स्त्रीवादी, रंजनवादी, संज्ञाप्रवाही, अस्तित्ववादी, वैज्ञानिक, पौराणिक असे विविध दृष्टिकोन ठेवून कथालेखन केले आहे.

१३. 'स्व'शी प्रामाणिक राहून 'स्व' चा शोध घेणारी कथा १९६० नंतरच्या कथालेखिकांनी लिहिलेली दिसते. कोणताही आडपडदा न ठेवता या कालखंडातील लेखिकांनी स्त्रीनिष्ठ अनुभव व्यक्त केलेला दिसतो.

१४. स्वत: जगलेल्या जीवनातून मिळालेले विविधांगी अनुभव, स्वत:च्या शब्दात मांडण्याची बंडखोरी हे १९६० नंतरच्या स्त्रियांच्या कथालेखनाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

१५. स्त्रियांकडे भोगवादी किंवा सहानुभूतीच्या दृष्टीने न बघता तिचे माणूस म्हणून असलेले अस्तित्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न १९६० नंतरच्या कथालेखिकांनी केला आहे.

मराठी कथालेखनाच्या प्रारंभापासून ते आजपर्यंत मराठीमध्ये अनेक कथालेखिकांनी कथालेखन केलेले आढळते. या लेखिकांनी स्त्री समस्यांबरोबरच एकूणच मानवी जीवनाचा वेधही घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. यामध्ये मेघना पेठे यांचे योगदान उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. त्यामुळे मेघना पेठे यांच्या कथालेखनाची आशयसूत्रे अभ्यासणे आवश्यक ठरते.

१. ३ डिसेंबर १९५८ साली मुंबई येथे मेघना पेठे यांचा जन्म झाला. त्यांनी 'हंस अकेला' (१९९७) व 'आंधळ्याच्या गायी' (२०००) हे कथासंग्रह व 'नातिचरामि' (२००५) ही कादंबरी लिहिली आहे. कविता, एकांकिका, स्फूट लेख, सदरलेखन आणि अनुवाद या साहित्य क्षेत्रामध्येही लेखन केले आहे.

२. मध्यमवर्गीय जीवनातील ताणतणावामध्ये पिचणारी व कुढणारी माणसे, त्याचबरोबर आलेल्या परिस्थितीशी तडजोड करून वरवरच्या समाधानाने वाट्याला आलेले एकाकीपण निमूटपणे जगणारी माणसे व त्यांचे तुटलेपण यांचे प्रभावी चित्रण मेघना पेठे यांनी आपल्या कथांमधून केले आहे. 'छाया... माया... काया...' या कथेतील विभा ही घर, पती व मुले या मोजक्या व्यक्तींमध्ये राहूनही एकाकी आयुष्य जगताना दिसते. भौतिक सुखात राहूनही

मानवाची असलेली **'एकाकीपणाची जाणीव'** हे मेघना पेठे यांच्या कथालेखनाचे अत्यंत महत्त्वाचे आशयसूत्र आहे.

३. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. या गरजांबरोबरच शारीर सुख ही मानवाची मुलभूत गरज आहे. स्त्री व पुरुष दोघांनाही शरीर गरजा आवश्यक आहेत. मानवी मनाची ती एक सहज प्रवृत्ती आहे. 'समुद्री चहुकडे पाणी...' या कथेतील 'ती' ला नेरूरकरांबद्दल शरीर आकर्षण वाटते. त्यामध्ये तिला वावगे काही वाटत नाही. **'शरीरसुखाची आस'** या आशयसूत्रावर मेघना पेठे यांच्या बहुतांशी कथा आधारलेल्या आहेत.

४. मानव हा समाजशील प्राणी असल्यामुळे समाजात राहणे तो अधिक पसंत करतो. मानवाला परस्पर सहवासाची अपेक्षा असते. एकाकी जगणाऱ्या कोणत्याही मनुष्याला क्षणभरासाठी दुकटे होण्याची इच्छा निर्माण होते. त्यासाठी घर, कुटुंब यासारखी बंधने तो निर्माण करीत असतो. 'होओवे लागे' या कथेतील केसकरला दुकटेपणा हवा असतो. म्हणून नाकारलेल्या गिझरेला ती होकार देते. 'सी सॉ' कथेमध्ये एकट्या असलेल्या माई ह्या आशुतोषच्या आठवणीमध्ये दुकटेपणा शोधतात. **'दुकटेपणाची आस'** हे आशयसूत्रही मेघना पेठे यांच्या काही कथांमध्ये आढळते.

५. आर्थिक परिस्थितीपुढे व्यक्ती हतबल होते. त्यामुळे आर्थिक परिस्थितीशी तडजोड करीत व्यक्ती जगत असते. गरिबीपासून लांब जावू पाहणाऱ्या रमाकांतला सुखी व सुरक्षित आयुष्य हवे असते. गरिबीमुळे त्यापासून तो वंचित राहतो. कॉलनीत राहणाऱ्याचे स्वप्न पाहणाऱ्या पाठकच्या नशिबीही धारावी झोपडपट्टी येते. व्यक्ती परिस्थितीमुळे असहाय्य होते हे **'परिस्थितीने आलेली हतबलता'** या आशयसूत्रातून सूचित होते.

६. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे त्या आपल्या विवाहाबद्दल स्वतंत्र विचार मांडू लागल्या आहेत. त्यांच्या विचाराकडे मात्र गांभीर्याने पाहिले जात नाही. 'आएँ कुछ अब्र' या कथेतील 'ती'ला गुलामीची वागणूक देणारा पुरुष

पती म्हणून नको असतो तर समजून घेणारा सहमानव हवा असतो तो न मिळाल्याने कुमारिका राहणे ती पसंत करते. 'ती' प्रौढ कुमारिका असल्याने 'ती'च्याकडे भोगवादी दृष्टिकोनातून पाहिले जाते. 'होआवे लागे' मधील केसकरकडेही भोगलालसेच्या दृष्टीने पाहिले जाते. अशाप्रकारे **'प्रौढ कुमारिकेचा प्रश्न'** या आशयसूत्राचा आढळ मेघना पेठे यांच्या कथालेखनात जाणवतो.

७. पारंपरिक समाजव्यवस्थेमुळे आजही स्त्रीला दुय्यम लेखले जाते. तिच्याकडे पुरुषाप्रमाणे बुद्धी, प्रतिभा असूनही ती केवळ 'स्त्री' आहे म्हणून तिला पुढे येऊ दिले जात नाही. 'सहोदरा ऽ' या कथेत सख्ये भाऊ-बहीण असूनही भावापेक्षा बहिणीला दुय्यम वागविले जाते. तर 'अठरावा उंट' मध्ये सुजाताकडे नाट्याभिनयाचे गुण असूनही तिला घरी बसावे लागते या अनुषंगाने मेघना पेठे यांच्या कथालेखनात **'स्त्रीचे दुय्यम स्थान'** हे आशयसूत्र ठळक रूपात व्यक्त झालेले दिसते.

८. पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीमध्ये स्त्रियांवर अनेक बंधने लादली जातात. सामाजिक व कौटुंबिक बंधनापासून स्त्रीला मुक्त व्हावेसे वाटते. त्यामुळे समाजाने जन्मापासून घालून दिलेल्या बंधनाचा त्याग करण्याचा ती विचार करते. 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेतील मिथिला ही जीवनात कोणतीही तडजोड न करता जगते. समाजाचे व कुटुंबाचे बंधन ती नाकारते. स्वतःपुरते जगत असताना पुरेसे सामाजिक भानही तिच्याकडे आहे. 'आएँ कुछ अब्र' मधील 'ती' ला सामाजिक व कौटुंबिक बंधनातून मुक्त व्हावेसे वाटते. या अनुषंगाने **'मुक्त होण्याची आकांक्षा'** हे आशयसूत्र मेघना पेठे यांच्या कथालेखनात विशेषत्वाने जाणवते.

९. पती-पत्नी या दोन घटकांशिवाय कुटुंब पूर्ण होऊ शकत नाही. हे दोन घटक परस्परपुरक असतात. 'अठरावा उंट' या कथेत सुजाताच्या एकाकीपणामुळे व संजीवच्या आत्ममग्नतेमुळे दोघांमध्ये संघर्ष निर्माण होतो. त्याप्रमाणे

'सहोदराऽ' कथेमध्ये घरामध्ये सर्वश्रेष्ठ स्थान मिळालेल्या आदिलमध्ये व 'ती' मुलगी असल्यामुळे तिला मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीमुळे बहीण-भावामध्ये संघर्ष निर्माण होतो. **'स्त्री-पुरुषांमधील संघर्ष'** हेही आशयसूत्र मेघना पेठे यांच्या कथांमध्ये आढळते.

१०. मानवी जीवनात शक्य-अशक्य वाटणाऱ्या घटना सतत घडत असतात. त्यांना न घाबरता मानव आयुष्यात अनेक धोके पत्करत जगतो. मानवाचे आयुष्य जगणे म्हणजे त्याचे अंधारात चाचपडणे असते. 'एक ननैतिक बघ्या' या कथेतील बिट्टूच्या जीवनात अनेक अनभिज्ञ अशा घटना घडतात. त्याच्यावर जिवापाड प्रेम करणारा तात्या व प्रेम न करणारी आई हे त्याचे खरे आई-वडील नसून वसुआत्या ही त्याची आई असते. तो अनैतिक संबंधातून जन्माला आलेला असतो. म्हणजेच मानवी जीवनातील अनेक अतर्क्य घटनांचा अर्थ लावणे अशक्य असते. **'मानवी जीवनातील अतर्क्यता'** हे मेघना पेठे यांच्या कथालेखनातील अत्यंत महत्त्वाचे आशयसूत्र दिसून येते. 'आंधळ्याच्या गायी' या शीर्षकातूनही ते प्रतित होते.

११. समाज स्त्रीकडे माणूस म्हणून न पाहता 'बाई' म्हणून पाहतो. स्त्रीला 'बाई' म्हणून समजण्याचा पुरुषप्रधान समाजव्यवस्थेची जाण तिला येणे म्हणजे स्त्रीचे आत्मभान होय. 'आएँ कुछ अब्र' मधील 'ती' सामाजिक व कौटुंबिक बंधनाना झुगारते तरीही स्वत:ला हवा असणारा सहमानव शोधण्यासाठी धडपडते. स्त्रीचे माणूसपण **'स्त्रीला आलेले आत्मभान'** या आशयसूत्रामधून लक्षात येते.

१२. पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये पुरुषाला मिळालेले महत्त्व आणि विवाहसंस्थेमधून स्त्रीला आलेले दुय्यम स्थान, एकांगी विवाहसंस्थेच्या काचकारक नियम यामुळे स्त्रीची कोंडी होते. अशी विवाहसंस्था का स्वीकारा की ज्यामुळे स्वत:चे माणूसपण संपूण जाते? 'आस्था आणि गवारीची भाजी' मध्ये मिथिला विवाहसंस्थाच नाकारते, तर उषाला पतीच्या असहकार्यामुळे लग्नबंधन नकोसे

वाटते. त्यामुळे **'विवाहसंस्थेबद्दलची अनास्था'** हे आशयसूत्रही मेघना पेठे यांच्या कथेत आढळते.

१३. आजपर्यंतच्या स्त्रियांच्या कथालेखनामध्ये 'स्त्री' च्या विविध समस्या आल्या आहेत. बहुतांशी कथालेखिकांनी आपण स्त्री आहोत या जाणिवेतून लेखन केलेले आढळते. मेघना पेठे यांच्या कथालेखनात 'मी स्त्री आहे' असा एकाकी स्वर येत नाही. या पलीकडे जाऊन आपणही माणूस आहोत याचे नैसर्गिक भान त्यांच्या कथेतील आशयसूत्रातून दिसते.

मेघना पेठे यांच्या कथासंग्रहातील प्रत्येक कथा आशयाचे वेगळेपण जपणारी आहे. 'मानवी जीवनातील एकाकीपण' आणि 'मानवी जीवनातील अतर्क्यता' या दोन आशयसूत्राचे विविध पैलू त्यांच्या कथालेखनात आढळतात. 'माणसाचे माणूसपण' हे त्यांच्या आशयसूत्रातून प्रतिबिंबित होताना दिसते.

मेघना पेठे यांच्या 'हंस अकेला' व 'आंधळ्याच्या गायी' या कथासंग्रहातील आशयसूत्राप्रमाणे व्यक्तिरेखाही वेगळ्या जाणवतात. या व्यक्तिरेखा महानगरीय जीवनातील व्यक्तींचे प्रतिनिधित्व करताना दिसतात.

१. आजूबाजूला अनेक माणसे असूनही आयुष्यात एकाकी जगणाऱ्या व्यक्तिरेखांचे चित्रण मेघना पेठे यांनी केले आहे. 'सी सॉ' या कथेमध्ये माईंना मामा-मामींनी सांभाळल्यामुळे प्रेमापासून वंचित असलेल्या व पतीकडून प्रेमाची अपेक्षा फोल ठरल्यामुळे एकाकी जीवन जगणाऱ्या माईंची व्यक्तिरेखा येते. 'समुद्री चहुकडे पाणी...' या कथेतील 'ती' ही एकाकी जीवन जगते. तर घर आणि घरातल्या व्यक्ती दूर गेल्यामुळे एकाकी झालेली 'विभा' ही व्यक्तिरेखा 'छाया... माया... काया...' या कथेत येते. नाटकाच्या वेडापायी एकाकी आयुष्य वाट्याला आलेल्या 'एक दिवस 'स्ट्र' चा' या कथेतील स्ट्रगल करणाऱ्या 'स्ट्र'ची व्यक्तिरेखा विचार करायला भाग पाडते. 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेतील मिथिलेच्या व्यक्तिरेखेतून मानवी जीवनातील अटळ एकाकीपण सूचित होते.

२. प्रौढ कुमारिकेला समाजाकडून व कुटुंबाकडून त्रास सहन करावा लागतो. अशा प्रौढ कुमारिकेचे चित्रण मेघना पेठे यांनी केले आहे. 'आएँ कुछ अब्र' या कथेतील 'ती' ही प्रौढ कुमारिका असल्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. त्याप्रमाणे 'समुद्री चहुकडे पाणी...' मधील 'ती'कडे समाज भोगवादी दृष्टीने पाहतो.

३. मेघना पेठे यांच्या कथेमध्ये 'शरीरसुखाची आस' असणाऱ्या व्यक्तिरेखा दिसून येतात. 'कोल्ह्याचं लगीन' मधील आशुतोषच्या घरी काम करणाऱ्या मंजुळाबाईंना आशुतोषबरोबरचा शरीरसंबंध चुकीचा वाटत नाही. 'समुद्री चहुकडे पाणी...' मधील 'ती' लाही विवाहित असलेला नेरूरकर आवडतो. अथवा 'होआवे लागे' मधील केसकरला वर्तक आणि नंतर गिझरे आवडतात.

४. असहाय्य झालेला एकाकीपणा घालविण्याची वृत्ती मेघना पेठे यांच्या कथेतून चित्रित झालेल्या व्यक्तिरेखांमध्ये दिसते. 'होआवे लागे' मधील श्रीमती केसकर ही एकाकीपणातील आधार मिळविण्यासाठी काळ्या व कुरूप केसकरला स्वीकारतो. 'सी सॉ' मधील माई आशुच्या आठवणीमध्ये दुकटेपणा शोधतात तर 'समुद्री चहुकडे पाणी...' मधील 'ती' लवशी खेळण्यात, गप्पा मारण्यात आणि गाणे शिकण्यात दुकटेपणा शोधते.

५. परिस्थितीने हतबल झालेल्या व्यक्तिरेखाही मेघना पेठे यांच्या कथालेखनात येतात. 'स्मरणाचा उत्सव जागुन...' कथेतील रमाकांत बने याला सुरक्षित, निरागस व श्रीमंतीचे आयुष्य जगावेसे वाटते परंतु परिस्थितीमुळे तो हतबल होतो. 'समुद्री चहुकडे पाणी...' या कथेतील पाठकलाही परिस्थितीमुळे धारावी झोपडपट्टीत जावे लागते.

६. समाजामध्ये व कुटुंबामध्ये स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. दुय्यम स्थान मिळालेल्या व्यक्तिरेखा मेघना पेठे यांच्या कथेमध्ये येतात. 'सहोदरा ऽ' या कथेमध्ये एकाच आईच्या पोटातून जन्माला येऊनही 'ती'ला तिच्या भावापेक्षा दुय्यम स्थान दिले जाते. 'अठरावा उंट' या कथेमधील सुजातालाही

संजीवकडून दुय्यम दर्जाची वागणूक मिळते, तर 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेतील उषाला 'ती स्त्री आहे' म्हणून दुय्यम स्थान मिळते.

७. मेघना पेठे यांच्या कथेमध्ये 'मुक्त होण्याची आकांक्षा' बाळगणाऱ्या व्यक्तिरेखाही दिसून येतात. 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेमधील मिथिलेला घराचे बंधन नकोसे वाटते. 'आएँ कुछ अब्र' मधील 'ती' लाही बंधनातून मुक्त व्हावेसे वाटते.

८. भविष्यातील जीवनात घडणाऱ्या घटनांच्या परिणामांबद्दल माणसे अनभिज्ञ असतात. जीवनात घडणाऱ्या अनेक अनभिज्ञ घटनांचा अर्थ न लागलेल्या बिट्टूची व्यक्तिरेखा 'एक ननैतिक बघ्या' या कथेमध्ये येते. बिट्टूच्या आयुष्यात अनेक अतर्क्य अशा घटना घडतात. तात्या नंबर एक त्याच्यावर जिवापाड प्रेम करत असतो आणि एक दिवस अचानक तो निघून जातो. जिला आई म्हणावे ती आई नसते आणि वसुआत्या ही आई असल्याचे कळते. यासारख्या अनेक अतर्क्य गोष्टींना त्याला सामोरे जावे लागते. 'स्मरणाचा उत्सव जागुन...' या कथेमधील रमाकांत बनेच्या आयुष्यातही अशा अनेक अतर्क्य घटना घडतात.

९. मेघना पेठे यांच्या कथेमध्ये आत्मभान आलेल्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखाही येतात. 'होआवे लागे' मधील श्रीमती केसकर ही आलेल्या स्थळाला नकार देते. त्याप्रमाणे 'समुद्री चहुकडे पाणी...' या कथेतील 'ती' ही आपली शारीरिक गरज पूर्ण करते. 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेतील मिथिला ही स्वत: बाई असल्याचे भांडवल न करता ऑफीसमधली सगळी कामे करते.

१०. विवाहामुळे स्त्रियांना सोसाव्या लागणाऱ्या अनेक बंधनामुळे व पती-पत्नीमध्ये सहकार्याची भावना नसल्यामुळे 'विवाहसंस्थेबद्दल अनास्था' वाटणाऱ्या व्यक्तिरेखा मेघना पेठे यांच्या कथेमध्ये येतात. 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेतील उषाला लग्नानंतर घर व मुलाला सांभाळून नोकरी करावी लागते हे सगळे करत असताना संजीवचे सहाय्य तिला मिळत नाही. त्यामुळे

विवाहाबद्दल तिच्या मनात अनास्था निर्माण होते. 'अठरावा उंट' या कथेमध्ये संजीवच्या आत्ममग्नतेमुळे सुजाताला विवाहाचे बंधन नकोसे वाटते. 'सहकार्य, साहचर्य आणि सहवास या गोष्टी संसारात नसल्याने विवाहाबद्दल अनास्था निर्माण झालेल्या अनिरुद्धची व्यक्तिरेखा 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथेत येते.

११. कुटुंबापासून तुटलेल्या व्यक्तिरेखा मेघना पेठे यांच्या कथांमध्ये येतात. 'स्मरणाचा उत्सव जागुन...' या कथेमधील रमाकांत आईचा स्वार्थी हेतू कळाल्यावर घरापासून तुटतो. 'एक दिवस 'स्ट्र'चा' या कथेतील 'स्ट्र' हा नाट्यसृष्टीत स्ट्रगल करण्यासाठी घरापासून लांब जातो. आई अपंग मुलाला मारू शकते हे पाहून 'कोल्ह्याचं लगीन' मधला आशुतोष घरापासून तुटतो तर 'एक ननैतिक बघ्या' कथेतील बिट्टू हा तात्या नंबर दोनचा स्वार्थी हेतू कळल्यानंतर निरुद्देश भटकू लागतो.

१२. आजपर्यंतच्या कथालेखिकांनी प्रामुख्याने स्त्रियांच्या व्यक्तिरेखांवर भर दिलेला जाणवतो. त्यांच्या कथालेखनामध्ये पुरुष व्यक्तिरेखा अभावानेच आढळतात. मेघना पेठे यांच्या कथेमध्ये स्त्री व्यक्तिरेखांबरोबरच पुरुष व्यक्तिरेखांही आलेल्या आहेत. मेघना पेठे यांच्या कथेतील पुरुष व्यक्तिरेखांना स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व आहे. 'एक ननैतिक बघ्या' या कथेतील बिट्टूची व्यक्तिरेखाही याचे उत्तम उदाहरण आहे. 'अठरावा उंट' या कथेतील संजीवची व्यक्तिरेखाही अशीच आहे.

१३. मेघना पेठे यांच्या 'हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' या दोन्ही कथासंग्रहामधील बहुतांशी व्यक्तिरेखा ह्या एकाकी जगणाऱ्या आहेत. भूतकाळातील आठवणीमध्ये रमून जाणे हा त्यांचा स्वभावधर्म दिसतो. याशिवाय शरीराची गरज पूर्ण करीत असताना ती मनाची मुलभूत गरज आहे ही वृत्ती मेघना पेठे यांच्या कथामधील व्यक्तिरेखांमध्ये दिसते. मेघना पेठे यांच्या कथेतील व्यक्तिरेखा ह्या मानवी संबंधाकडे सहजपणे बघतात.

१४. जीवनात अनेक दु:खे असली तरी या दु:खांना सामोरे जाऊन वाट्याला आलेले जीवन कोणतीही तक्रार न करता जगणे हे मेघना पेठे यांच्या कथेतील व्यक्तिरेखांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

१५. भक्ती, त्याग, समर्पण या उदात्त जीवनमुल्यांपेक्षा सामान्य माणसांच्या जीवन जाणिवांचा आधार घेऊन मेघना पेठे यांच्या कथासंग्रहातील व्यक्तिरेखा चित्रित होताना दिसतात.

मेघना पेठे यांच्या कथांमधील व्यक्तिरेखा ह्या महानगरीय वातावरणाशी संबंधित असणाऱ्या आहेत. पारंपरिक जीवनमूल्ये जोपासणाऱ्या व्यक्तिरेखांबरोबरच बंडखोर विचारसरणी जोपासणाऱ्या व्यक्तिरेखांही त्यांनी चित्रित केलेल्या आहेत. त्यांच्या कथांची रचना ही आशयाला व व्यक्तिरेखांना उठाव देणारी आहे. त्यामुळे मेघना पेठे यांच्या कथालेखनाचे रचनाविशेष खालीलप्रमाणे पाहता येतील.

१. मेघना पेठे यांच्या कथेचे कथानक हे घटकांना कार्यकारणभाव सांधून आकारास येते. कथालेखनात एकाचवेळी समस्याकेंद्री व व्यक्तिकेंद्री कथानक कथाबद्ध होताना दिसते. त्यामुळे कथानकाची रचना ही बांधेसूद झाली आहे.

२. मेघना पेठे यांच्या कथांमध्ये महानगरीय वातावरण हे विशेषत्वाने चित्रित झालेले आहे. त्यांच्या कथेत महानगरीय वातावरणाचा सहसंबंध हा आशयाशी जोडलेला दिसतो. महानगरातील वाहनांची गर्दी, माणसांची गर्दी, मोठ-मोठ्या इमारती, माणसांचे घड्याळाच्या काट्याप्रमाणे धावणे अशा प्रकारच्या महानगरीय वातावरणाचे चित्रण मेघना पेठे यांच्या कथेत येते.

३. मेघना पेठे यांच्या कथेतील प्रसंगनिर्मिती ही वास्तवतेला कल्पकतेचा स्पर्श होऊन आलेली आहे. 'कोल्ह्याचं लगीन' कथेतील आशुतोषचे त्याच्या आईने अपंग मुलाला मारलेल्या प्रसंगामुळे जीवन बदलते त्याप्रमाणे 'अठरावा उंट' ही लोककथा सांगताना निर्माण झालेल्या प्रसंगामुळे सुजाताला आपल्या जीवनाचा हेतू प्राप्त होतो. त्यामुळे सुजाताच्या आयुष्याला एक वेगळा आकार मिळतो.

४. मेघना पेठे यांनी व्यक्तिचित्रण करताना तटस्थ भूमिका स्वीकारलेली दिसते. स्त्री व्यक्तिरेखा आणि पुरुष व्यक्तिरेखा त्यांनी तितक्याच सामर्थपणे चित्रित केल्या आहेत. मेघना पेठे यांच्या कथांमध्ये व्यक्तिचित्रण हे चित्रमय रीतीने स्पष्ट होते. व्यक्तीच्या वर्णनातून व्यक्तीचे भोवताल, भाषा, शिक्षण, वय, व्यवसाय या संदर्भातील माहितीही व्यक्तिचित्रणातून मिळते.

५. मेघना पेठे यांच्या कथेत प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी निवेदनाचा वापर दिसतो. वर्तमानकाळ व भूतकाळ यामध्ये समांतर असणारे निवेदन हे कथानकाशी सुसंगत होते. मेघना पेठे यांनी कधी 'मी' शी तादात्म्य होवून निवेदन केले आहे तर कधी निवेदनासाठी एखादे पात्र निर्माण केले आहे. तर कधी निवेदनासाठी एखादे पात्र निर्माण केले आहे. पात्रांच्या मनातील कोलाहल निवेदनातून अधिक स्पष्ट होत जातो. त्यामुळे वर-वर सुखी वाटणारी ही माणसे आतून एकाकीपणाच्या दु:खाने कशी पोखरली आहेत हे निवेदनातून स्पष्ट होते.

६. मेघना पेठे यांच्या कथालेखनामधील निवेदनाच्या भाषेमध्ये वैविध्यपूर्णता दिसते. त्याप्रमाणे सहजपणा दिसतो. कथेच्या आशयानुसार भाषा आलेली दिसते.

७. मेघना पेठे यांच्या कथेमधील व्यक्तिरेखा, वातावरण व आशय नागरी जीवनातील असल्यामुळे त्यांच्या कथेतील संवाद व निवेदनामध्ये मराठी भाषेबरोबर इंग्रजी, हिंदी, उर्दू या भाषांही आलेल्या आहेत.

८. त्यांच्या कथेमध्ये 'लग्नाळू', 'खाजाळू', 'सावज' यासारखे शब्द आलेले आहेत. या शब्दांची रचना ही नियमानुसार असली तरी रूढ रूपाहून वेगळी आहे. त्याच्या कथालेखन कौशल्यात अनुभवाचे फक्त वर्णन केले नाही तर अनुभव जिवंत करण्याचे सामर्थ्य आहे.

९. मेघना पेठे यांच्या कथेत प्रश्नार्थक शैली ही फक्त प्रयोगासाठी आलेली नाही तर स्त्रीजीवनाशी प्रश्न शैलीचे नाते असलेले दिसते. उदा. म्हणजे तरी जागा

होशील तू? की चिवड्यातला दाणा तुझ्या अन्ननळीत घालून बघू?' यासारख्या प्रश्नांतून स्त्रीमनाची घालमेल व जाणीव व्यक्त होते.

१०. मेघना पेठे यांच्या कथेतील व्यक्तिरेखांना बरेच काही बोलायचे आहे परंतु त्यांना ते प्रकट करता येत नाही. उदा. 'फक्त तिचं ... वाहून गेलेले 'तिची गोष्ट...' त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखांना जे काही सांगायचे आहे ते शब्द रूपात प्रकट होत नाही. अशावेळी लेखिकेने लोपचिन्हांचा वापर केला आहे.

११. अभ्यस्त शब्दांची रचना भाषेला लय प्राप्त करण्यासाठी झाली आहे. 'अमुक-तमुक', 'लाडकी-फिडकी', 'सोक्ष-मोक्ष' यासारख्या अभ्यस्त शब्दांमुळे कथेतील भाषेला बोलीचे रूप प्राप्त झाले आहे.

१२. 'मानवी जीवनातील एकाकीपण' सूचित करण्यासाठी पिंपळ या वृक्षाची प्रतिमा कथेमध्ये पुन:पुन्हा येते. त्याप्रमाणे 'मानवी जीवनातील एकाकीपण' हे 'पान झडून गेलेल्या व फुलांनी उवरून गेलेले देवचाफ्याच्या झाडांच्या प्रतिमेतूनही सूचित झाले आहे. कोणत्याही घटनेवर लगेच दु:खी झाल्यास त्या व्यक्तिरेखेला 'साने गुरुजी' ही प्रतिमा ही वारंवार येताना दिसते.

१३. मानवी जीवनातील अनिश्चितता व्यक्त करण्यासाठी 'एक ननैतिक बघ्या' या कथेत 'मृत्यूपासून लांब हिमालयात पळणाऱ्या पोपटाच्या पिल्लाचा मृत्यू हा हिमालयाच्या गुहेत असतो' ही लोककथा येते. तर जीवनात कोणतेच हेतू नसलेल्या नायिकेला हेतूची आठवण करून देण्यासाठी 'अठरावा उंट' ही लोककथा येते. मेघना पेठे यांच्या कथेतील लोककथेच्या योजनेमुळे त्यांच्या कथांची रचना ही वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे.

१४. मेघना पेठे यांच्या कथांची शीर्षके ही वेगळी, अर्थबोधक व आशय स्पष्ट करणारी आहेत. 'हंस अकेला' या शीर्षकांतून 'मानवी जीवनातील एकाकीपणा' स्पष्ट होते तर 'आंधळ्याच्या गायी' या शीर्षकांमधून 'मानवी जीवनातील अतर्क्यता' सूचित होते. 'एक ननैतिक बघ्या' या शीर्षकांमध्ये

'अनैतिक' या शब्दाची मोडतोड केली आहे तर 'सी-सॉ' या कथेच्या शीर्षकातून माईंच्या आयुष्यातील चढ-उतार लक्षात येतो.

१५. आजपर्यंतच्या अधिकतर स्त्रियांनी जाणीवपूर्वकतेने भाषेची रचना केलेली आढळत नाही. वातावरणाशी व आशयाशी सुसंगत भाषा कथालेखिकांच्या लेखनामध्ये क्वचित आढळते. मेघना पेठे यांच्या कथेतील भाषेमध्ये सहजपणा दिसतो. त्या अतिशय गांभीर्याने भाषेचा वापर करतात. कथाआशय, व्यक्तिरेखा, वातावरण या घटकांना बांधून ठेवणारी भाषा त्यांनी योजिलेली आहे. त्यांच्या कथारचनेत कलात्मकतेबरोबरच आशयघनताही आढळते.

'हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' या कथासंग्रहाच्या आधारे 'मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास' केल्यानंतर काही विशेष बाबींची नोंद घेता येईल.

१. मराठी कथालेखनात स्त्रियांनी लिहिलेल्या कथांमध्ये मेघना पेठे यांची कथा उल्लेखनीय स्वरूपाची आहे. आपण स्त्री आहोत याचे नको तितके भान त्यांच्या कथेत येत नाही. स्त्री-पुरुष नात्याकडे त्या सहज भावनेने पाहतात. त्यामुळे त्याची कथा 'स्त्री' जीवनाच्या कक्षा ओलांडून मानवी संबंधाचा वेध घेताना दिसते.

२. काळानुसार बदललेल्या जाणिवेमुळे स्त्रियांच्या मानसिकेमध्ये झालेला बदल, लोकांच्या गर्दीतही व्यक्तीला येणारे एकाकीपण आणि व्यक्तीच्या आयुष्यात घडून येणाऱ्या अनाकलनीय, अतर्क्य घटना, हे मेघना पेठे यांच्या कथालेखनाचे आशयकेंद्र म्हणता येते

३. मेघना पेठे यांच्या कथालेखनातले गांभीर्य, कलात्मकता, व्यक्तिरेखेला त्याचा स्वत:ला हवा असलेला म्हणून दिलेला आत्मा, लोककथांची अर्थपूर्ण योजना, कथांची समर्पक शीर्षके, भूतकाळातील स्मरणांचे उपयोजन या बाबी मराठी कथा वाङ्मय आशयदृष्ट्या व रचनादृष्ट्या पुष्ट करणाऱ्या ठरतील.

★ ★ ★

# परिशिष्ट

१. अभ्यासग्रंथ

२. संदर्भ ग्रंथ सूची

३. नियतकालिकांची सूची

## १. अभ्यासग्रंथ (कथासंग्रह व त्यामधील कथा)

**अ. 'हंस अकेला', मेघना पेठे, राजहंस प्रकाशन, पुणे. चौ.आ. एप्रिल २००२**

१. 'समुद्री चहुकडे पाणी...'
२. 'एक दिवस 'स्ट्र' चा...'
३. 'कोल्ह्याचं लगीन!'
४. 'होआवे लागे...'
५. 'स्मरणाचा उत्सव जागुन...'
६. 'सी सॉ'
७. 'छाया...माया...काया...'

**ब. 'आंधळ्याच्या गायी', मेघना पेठे, राजहंस प्रकाशन, पुणे. व्दि.आ. जानेवारी २००१**

१. 'एक ननैतिक बघ्या'
२. 'आएँ कुछ अब्र...'
३. 'अठरावा उंट'
४. 'सहोदराऽ'
५. 'आस्था आणि गवारीची भाजी'

## २. संदर्भ ग्रंथ सूची


१. आचवल माधव : 'जास्वंद'
मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९७४.

२. आठलेकर मंगला : संपा. 'तिची कथा'
राजहंस प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९७.

३. कऱ्हाडे सदा : 'साहित्य आणि समाज'
लोकवाङ्.मय गृह, मुंबई, व्दि.आ.एप्रिल १९९९.

४. कुलकर्णी अनिरुद्ध : संपा. - 'प्रदक्षिणा' खंड दुसरा
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
पुर्नमुद्रण २०००.

५. कुलकर्णी दा.वि. : 'मराठी कथा, स्वरुप आणि आस्वाद'
स्वाध्याय विद्यालय प्रकाशन, पुणे
प्र.आ. १९७६.

६. कुलकर्णी वा.ल. : 'मराठी नवकथेचे सामर्थ्य : वाङ्.मयीन दृष्टी आणि दृष्टिकोण',
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, व्दि. आ. १९६७.

७. खांडगे मंदा व इतर : संपा. - 'स्त्री साहित्याचा मागोवा'
खंड १ व २
प्रतिमा प्रकाशन, पुणे
प्र.आ.२००२

८. गणोरकर प्रभा व इतर : संपा. - 'संक्षिप्त मराठी वाङ्.मयकोश',
जी.आर. भटकळ फाउण्डेशन, मुंबई
प्र.आ. फेब्रुवारी २००४.

९. गणोरकर प्रभा व इतर : संपा. - 'वाङ्.मयीन संज्ञा-संकल्पना कोश',
जी.आर. भटकळ फाउण्डेशन, मुंबई
प्र.आ. डिसेंबर २००१.

१०. गाडगीळ गंगाधर : 'खडक आणि पाणी',
पाप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९६०.

११. चवरे रा.गो. : 'मराठी कथा प्रवृत्ती आणि प्रवाह',
मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती
प्र.आ. १९९५.

१२. जोशी सुधा : 'कथा-संकल्पना आणि समीक्षा', मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २०००

१३. टिळक विद्यागौरी : संपा.- '१९६० नंतरचे स्त्रियांचे गद्यसाहित्य समीक्षा विविधा', पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्र.आ. २००५.

१४. देशपांडे अ.ना. : 'आधुनिक वाङ्.मयाचा इतिहास' (भाग २) व्हीनस प्रकाशन, पुणे पुनर्मुद्रण जानेवारी १९७९.

१५. देशपांडे गिरीश : संपा.- 'कथाकार विजया राजाध्यक्ष', पदव्युत्तर मराठी विभाग, एस्.एन्.डी.टी. विद्यापीठ, मुंबई आणि ग्रंथाली, प्र.आ. १९९५.

१६. देशपांडे शिरीष गोपाळ : 'रूपनिरूपण', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई प्र.आ. २०००.

१७. नेमाडे भालचंद्र : 'टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद प्र.आ. १९९०

१८. नेमाडे भालचंद्र : 'साहित्याची भाषा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद व्दि. आ. १९९८.

१९. पवार गो.मा. व हातकणंगलेकर म.द. : संपा. 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८६.

२०. पाटणकर, रा.भा. : 'कमल देसाई यांचे कथाविश्व', मौज प्रकाशन, मुंबई प्र.आ. १९८४.

२१. पुरोहित के.ज. व जोशी सुधा : संपा. - 'मराठी कथा : विसावे शतक', मॅजिस्ट्रेशन प्रकाशन, मुंबई, प्र.आ. ऑक्टोबर २००४.

२२. पोतदार अनुराधा : 'कुसुमावती वाङ्.मयदर्शन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे प्र.आ. १९७५.

२३. पोवार छाया : 'मराठी नागरकथा', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे, प्र.आ. २००३.

२४. फडके ना.सी. : 'लघुकथा लेखन - मंत्र आणि तंत्र', व्हीनस प्रकाशन, पुणे व्दि. आ. १९६८.

२५. फडके भालचंद्र : 'मराठी लेखिका चिंता आणि चिंतन', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८०.

२६. भागवत श्री.पु. व रसाळ सुधीर : संपा. 'साहित्य: अध्यापन आणि प्रकार', वा.ल. कुलकर्णी गौरवग्रंथ, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. एप्रिल, १९८७.

२७. भोपटकर अलका : 'विजया राजाध्यक्ष यांचे कथाविश्व', चंद्रकला प्रकाशन, पुणे प्र.आ. २००१.

२८. राजाध्यक्ष विजया : समन्वय संपा. - 'मराठी वाङ्.मयकोश', खंड ४ समीक्षा संज्ञा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्र.आ. नोव्हेंबर २००२.

२९. वरखेडे मंगला : 'स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे', कैलासराणा प्रकाशन, नाशिक, प्र.आ. १९९६.

३०. शेवडे इंदुमती : 'मराठी कथा उगम आणि विकास', सोमैया पब्लिकेशन, मुंबई प्र.आ. १९७३.

| | | | |
|---|---|---|---|
| ३१. | सारंग विलास | : | 'अक्षराचा श्रम केला',<br>मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २०००. |
| ३२. | सोमण अंजली | : | 'मराठी कथेची स्थितीगती',<br>प्रतिमा प्रकाशन, पुणे<br>प्र.आ. १९९५ |
| ३३. | हातकणंगलेकर म.द. | : | 'वाङ्.मयीन शैली आणि तंत्र',<br>अभिजात प्रकाशन, कोल्हापूर<br>प्र.आ. १९८१. |


## ३. नियतकालिकांची सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | अनुष्टुभ | : | जुलै-ऑगस्ट, १९९८. |
| २. | अनुष्टुभ | : | मार्च-एप्रिल, २००२ |
| ३. | दर्शन | : | दिवाळी, २००५ |
| ४. | प्रतिष्ठान | : | मार्च-एप्रिल, १९९२. |
| ५. | महाराष्ट्र साहित्य पत्रिका | : | ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर, १९९७. |
| ६. | ललित | : | जुलै, १९८८. |
| ७. | ललित | : | मार्च, १९८९. |
| ८. | ललित | : | जुलै, १९९८. |


***

891.463
PAT
T15406